SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004 MAHARASHTRA
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९००० संलग्नता टी-२ विभाग दूरध्वनी -०२३१ - २६०९०९१संचालक,बी.सी.यु.डी. कार्यालय, दूरध्वनी : (थेट) ०२३१ - २६०९०७०

Estd : 1962
NAAC 'A++' Grade
Accerediated by NAAAC (2021)
With CGPA3.52

जा.क्र. संलग्नता/टी-२/परिपत्रक/बीओडी वि.क्र.१९ दि. ५/७/२२ दि. 29 JUL 2022

No 0 0 6 9 8

# परिपत्रक

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक,

सर्व संलग्नीत महाविद्यालये,

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**विषय:-** महाराष्ट्र शासनाचा उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि नॅसकॉम (नॅशनल असोसिएशन ऑफ सॉफ्टवेअर ॲण्ड सर्विस कंपनीज-NASSCOM) यांचे दरम्यान झालेल्या सामंजस्य कराराबाबत...

**संदर्भ:-** १) मा. विकास चंद्र रस्तोगी, प्रधान सचिव उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मुंबई यांचेकडील जा.अ.शा.क्र/उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई दि. १० मे, २०२२ रोजीचे पत्र

महोदय/महोदया,

उपरोक्त नमूद विषय व संदर्भास अनुसरून केंद्र शासनाच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती व तंत्रज्ञान विभागाने नॅसकॉम च्या सहकार्याने **फ्युचर स्किल्स प्राईम हे ऑनलाईन व्यासपीठ** उपलब्ध करून दिले आहे. सदर ऑनलाईन व्यासपीठावर उपलब्ध कोर्सेसचा लाभ अधिकाधिक विद्यार्थ्यांना व शिक्षकांना व्हावा याकरिता सर्व महाविद्यालयांनी प्रभावीपणे अंमलबजावणी करावी, ही विनंती.

आदेशान्वये

श्री विलास एस.सोयम
उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

**सोबत-** वरीलप्रमाणे.

SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

VC Office <vcoffice@unishivaji.ac.in>

# महाराष्ट्र शासनाचा उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि नॅसकॉम (नॅशनल असोसिएशन ऑफ सॉफ्टवेअर अँड सर्विस कंपनिज – (NASSCOM) यांचे दरम्यान सामंजस्य कराराबाबत

**VINOD VASANT DALVI UNDER SECRETARY** <vinod.dalvi@nic.in> Thu, May 12, 2022 at 2:23 PM
To: vcoffice@unishivaji.ac.in, registrar@unishivaji.ac.in

Azadi Ka Amrit Mahotsav

**डॉ शिर्के.pdf**
1089K

# महाराष्ट्र शासन

विकास चंद्र रस्तोगी, भा.प्र.से.
प्रधान सचिव

अ.शा.क्र.
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
मंत्रालय, मुंबई.
दिनांक : १० मे, २०२२

विषय - महाराष्ट्र शासनाचा उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि नॅसकॉम (नॅशनल असोसिएशन ऑफ सॉफ्टवेअर अँड सर्विस कंपनिज-NASSCOM) यांचे दरम्यान सामंजस्य करार

प्रिय डॉ शिर्के

१. महाराष्ट्र राज्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना प्रशिक्षणाद्वारे माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील आणि विशेषतः उदयोन्मुख तंत्रज्ञान क्षेत्रातील (डेटा सायन्स, कृत्रिम बुद्धिमत्ता, इंटरनेट ऑफ थिंग्स, इ.) व्यावसायिक कौशल्ये प्रदान करण्यासाठी शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने नॅसकॉम (नॅशनल असोसिएशन ऑफ सॉफ्टवेअर अँड सर्विस कंपनिज-NASSCOM) यांचे समवेत दिनांक ९ मे २०२२ रोजी मा. श्री.उदय सामंत, मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य यांचे उपस्थितीत सामंजस्य करार केलेला आहे. महाराष्ट्र राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या वतीने (१) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय (DTE), (२) संचालक, उच्च शिक्षण संचालनालय (HTE), (३) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास अकॅडेमी (MSFDA) यांनी आणि कार्यकारी संचालक, IT-ITeS Sector Skills Council नॅसकॉम (नॅशनल असोसिएशन ऑफ सॉफ्टवेअर अँड सर्विस कंपनिज NASSCOM) यांनी या सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली आहे.

२. या सामंजस्य करारातील तरतूदी आणि त्या अनुषंगाने प्रशिक्षण उपक्रम याबाबत तपशील खालील प्रमाणे आहे:

- डिजिटल तंत्रज्ञान क्षेत्रात देशाला अग्रगण्य स्थान मिळावे आणि डिजिटल तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रशिक्षित मनुष्यबळाचे भारत हे वैश्विक केंद्र व्हावे या उद्देशाने केंद्र शासनाच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती व तंत्रज्ञान विभागाने नॅसकॉम च्या सहकार्याने फ्युचर स्किल्स प्राईम ( Future Skills Prime ) हे ऑनलाईन व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे.
- फ्युचर स्किल्स प्राईम (Future Skills Prime) या ऑनलाईन व्यासपीठावर कौशल्ये विकसित करणारे काही सशुल्क व काही निशुल्क असे ऑनलाईन अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.
- प्रशिक्षणार्थींना फ्युचर स्किल्स प्राईम (Future Skills Prime) या ऑनलाईन व्यासपीठावर नोंदणी करून ऑनलाईन कौशल्य विषयक अभ्यासक्रम शिकता येईल आणि हे अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या उमेदवारांना चाचणी नंतर प्रमाणपत्र मिळू शकेल.
- फ्युचर स्किल्स प्राईम (Future Skills Prime) या ऑनलाईन व्यासपीठावरील अभ्यासक्रम केवळ गणित विज्ञान, तंत्रज्ञान व अभियांत्रिकी शाखांच्या विद्यार्थ्यांपुरतेच मर्यादित नसून इतर शाखा उदा . वाणिज्य, कला या शाखेतील विद्यार्थ्यांना देखील आपली आवड आणि कल लक्षात घेऊन ऑनलाईन कौशल्य विषयक अभ्यासक्रम शिकता येतील.
- फ्युचर स्किल्स प्राईम (Future Skills Prime) या ऑनलाईन व्यासपीठावर मूलतः Big Data Analytics, Cyber Security, Internet of Things ( IoT), Augmented Reality/ Virtual Reality, Artificial Intelligence and Cloud Technologies या उदयोन्मुख तंत्रज्ञानाशी संबंधित प्रमाणित अभ्यासक्रम आहेत तसेच औद्योगिक जगतास Design Thinking, Project Management या सारख्या विषयातील प्रशिक्षित मनुष्यबळाची देखील मोठी गरज भासते ही बाब लक्षात घेऊन सध्या अशा प्रकारचे अभ्यासक्रम देखील उपलब्ध आहेत. पुढील काळात ह्यात आणखी नवीन अभ्यासक्रम जोडले जाणार आहे.
- फ्युचर स्किल्स प्राईम (Future Skills Prime)या व्यासपीठावर कल चाचणी (Aptitude), कल व क्षमता निदान (Capability Diagnosis) या सुविधा आहेत जेणेकरून विद्यार्थ्यांना करियर विषयक नियोजन करण्यास मदत होईल.

कृ.मा.प.

४०९, विस्तार भवन, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२. फोन नं. - ०२२-२२०२५३०१ | ई-मेल: psec.higheredu@maharashtra.gov.in

- फ्युचर स्किल्स प्राईम (Future Skills Prime) या ऑनलाईन व्यासपीठावरील अभ्यासक्रम खालील प्रमाणे विभागलेले आहेत:
  - Digital Awareness/Pathways
  - Foundation Courses
  - National Occupational Standard Aligned content/Deep skill courses
  - Bridge Courses
- प्रशिक्षण घेणाऱ्या उमेदवाराने केलेल्या प्रगतीचे मूल्यमापन करतांना त्यांना अधिकाधिक मेहनत करण्यासाठी उत्तेजन मिळण्याचे दृष्टीने "skills passport", "skills wallet", "badges" अश्या प्रकारचे अभिनव पारितोषिक दिले जाईल.
- फ्युचर स्किल्स प्राईम (Future Skills Prime) या व्यासपीठावर उपलब्ध अभ्यासक्रम नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील महत्त्वपूर्ण तरतुदींशी अनुरूप आहेत तसेच National Skills Qualification Framework (NSQF) प्रमाणे आहेत.
- वरील सुविधा असलेले Future Skill Prime हे ऑनलाईन व्यासपीठावर राज्यातील अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तूकलाशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट व केटरिंग तंत्रज्ञान, कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील विद्यार्थी, तसेच महाविद्यालयीन शिक्षक या सर्वांना सदर कराराच्या माध्यमातून प्रशिक्षणाची संधी उपलब्ध झालेली आहे.

३. या सामंजस्य करारातील तरतुदींप्रमाणे लाभ घेण्याकरीता आपणास विनंती करण्यात येत आहे की, आपल्या विद्यापीठ क्षेत्रातील सर्व महाविद्यालयातील प्राचार्य, शिक्षक व विद्यार्थ्यांपर्यंत याबाबतची पुर्ण माहिती देणेबाबत व्यवस्था करण्यात यावी. तसेच फ्युचर स्किल्स प्राईम (Future Skills Prime) या व्यासपीठावर उपलब्ध कोर्सेसचा लाभ घेण्यात यावा. या उपक्रमामुळे माहिती तंत्रज्ञान क्षेत्रास आवश्यक ते कुशल मनुष्यबळ उपलब्ध होऊन देशातील सेवा क्षेत्रास भरीव योगदान दिले जाईल सोबतच, सेवा क्षेत्रात माहिती तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि आज असलेली डिजिटल तंत्रज्ञान स्नेही तरुण पिढीची उपलब्धता हे अनुकूल घटक लक्षात घेता देशाला "डेमोग्राफिक डिविडेंड" चा नियोजनपूर्वक लाभ मिळू शकेल. ह्या संदर्भात पुढील काही दिवसातच एक ऑनलाईन वर्कशॉप आयोजित करुन अधिक माहिती उपलब्ध करुन दिली जाईल.

आपला स्नेहांकित

(विकास चन्द्र रस्तोगी)

प्रति,
प्रा. (डॉ) डी.टी.शिर्के,
कुलगुरू
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर.